स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. पदवीसाठी

सादर करावयाच्या शोधप्रबंधाचे प्रारूप

शोधप्रबंधाचे शीर्षक

“संत ज्ञानेश्वर यांच्या वाङ्मयाचा वीरशैव दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास”

संशोधक विद्यार्थी

अनिल बाबू स्वामी

मु.पो.राणीसावरगाव ता.गंगाखेड

जि.परभणी – ४३१५३६

भ्रमणध्वनी – ९७६३३३६६३३

ई मेल – anilswami54@gmail.com

संशोधन मार्गदर्शक

डॉ. विठ्ठल जंबाले

पदवी व पद्व्युत्तर मराठी विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय,

देगलूर ता.देगलूर जि.नांदेड – ४३१७१७

भ्रमणध्वनी –९४२२८७९६०९

ई मेल–jvithalh@gmail.com

जून २०१७

'' संत ज्ञानेश्वर यांच्या वाङ्मयाचा वीरशैव दृटिकोनातून चिकित्सक अभ्यास ''

प्रास्ताविक :–

समग्र मराठी वाङ्मयाला सुमारे आठशे वर्षांपेक्षा अधिक इतिहास आहे. यामध्ये सर्वांत महत्त्वाचे संत कवी म्हणून ज्ञानेश्वरांचा उल्लेख करावा लागतो. केवळ ज्ञानेश्वरी हा एक ग्रंथही ज्ञानेश्वरांचे मोठेपण जगातील अन्य भाषांच्या साहित्यविश्वात समर्थपणे पोहचवतो.

मराठी साहित्याच्या या अवाढव्य अशा वाङ्मयविश्वात संत ज्ञानेश्वरांचे स्थान अव्वल दर्जाचे आहे. कितीही अभ्यासकांनी कितीही प्रकारे अभ्यास करावा, असे संत ज्ञानेश्वरांचे वाङ्मय विलक्षण वाङ्मयीन व साहित्यिक गुणांनी भरलेले आहे. सर्वच कालखंडात संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचा अन्वय लावण्यात आलेला आहे. असा कालातीत वाङ्मयीन गुण त्यांच्या साहित्यात अभ्यासकांना पहावयास मिळतो.

म्हणूनच संत ज्ञानेश्वरांचे वाङ्मय विविध अंगांनी अभ्यासणे ही अभ्यासकांसाठी एक वैचारिक, तात्त्विक व काव्यात्मक पर्वणीच आहे. आजपर्यंत संत ज्ञानेश्वर वाङ्मयाचा साहित्यशास्त्र, काव्य, तत्त्वज्ञान, व्याकरण इ. विविधअंगांनी अभ्यास झालेला आहे. त्या अनुषंगाने संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यसंपदेचा एका वेगळया दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची क्षमता हे संत ज्ञानेश्वर वाङ्मयाचे सामर्थ्य आहे. संत ज्ञानेश्वर वाङ्मयाच्या अभ्यासाच्या संदर्भात एका बाबीचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल, ती म्हणजे ज्ञानेश्वरांची समन्वय साधण्याची भूमिका. यामुळे एका नूतन मार्गाने, नव्या दृष्टिकोनातून ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

अभ्यास विषयाचे महत्त्व :–

ज्ञानेश्वर वाङ्मयाचा विविध अंगांनी अभ्यास झालेला आहे. यापुढेही होऊ शकतो परंतु केवळ शांकरवेदान्ताच्या किंवा संस्कृत साहित्यशास्त्राच्या आधाराने ज्ञानेश्वरांच्या साहित्यकृतींचा अभ्यास हा त्यांच्यावरील अन्याय ठरेल. ज्ञानेश्वरांची उत्तुंग अशी नवनवोन्मेषशालीनी प्रतिभाशक्ती व तीव्रतम प्रज्ञा पाहता त्यांना विविध तत्त्वज्ञानाचा परिचय होता, प्रभावी समन्वयाची भूमिका होती, त्यामुळेच या अभ्यास विषयाचे एक वेगळेपण सिध्द करता येते.

संत ज्ञानेश्वरांचे वाङ्मय आणि वीरशैव साहित्य यांच्यातील अनुबंध प्रथमत:च विद्यापीठीय पातळीवर मांडण्यात येणार असल्यामुळे या विषयाचे महत्व आगळे वेगळे आहे.

संशोधन कार्याचे हेतू :–

१) संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाच्या अभ्यासाला समग्रता लाभावी.

२) ज्ञानेश्वरांच्या लोकभाषेतून साहित्यनिर्मितीच्या मूळप्रेरणांचा शोध घेणे.

३) ज्ञानेश्वरांच्या समन्वयशील दृष्टिकोनाची ओळख करून देणे.

४) संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या वाङ्मयाच्या संदर्भात असणारे अनेक गैरसमज दूर करणे.

५) आजच्या असहिष्णूतेच्या वातावरणात ज्ञानेश्वरांचे सहिष्णू विचार लोकांपर्यंत पोहचविणे.

६) ज्ञानेश्वर वाङ्मयाच्या अभ्यासाच्या नवीन दिशा शोधण्याचा प्रयत्न करणे.

७) वीरशैव साहित्य आणि ज्ञानेश्वर वाङ्मय यांच्यातील अनुबंध उलगडून दाखविणे.

८) वीरशैवांचे मराठी साहित्यातील योगदान शोधण्याचा प्रयत्न करणे.

गृहिते :—

१) ज्ञानेश्वर वाङ्मयातील वीरशैव प्रभावाच्या पाऊलखूणा शोधणे.
२) ज्ञानेश्वरांचा समन्वयशील दृष्टिकोन.
३) वीरशैवांचा नाथपंथावरील प्रभाव.
४) बसवेश्वरांच्या कल्याणक्रांतीचा संत ज्ञानेश्वरावरील प्रभाव.
५) ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्रावरील वीरशैवांचा प्रभाव.
६) नाथपरंपरा व वीरशैव यांच्यातील अनुबंध.
७) संत ज्ञानेश्वर आणि वीरशैव संतकवींचा परस्परांवरील प्रभाव.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :—

या संशोधन विषयासाठी ज्ञानेश्वरांचे वाङ्मय व वीरशैव संप्रदायाचे साहित्य यांच्या आधारे मीमांसा करणे अभिप्रेत आहे. या संशोधन विषयासाठी प्रामुख्याने ज्ञानेश्वर वाङ्मय आधारभूत मानण्यात येईल. यामध्ये १) ज्ञानेश्वरी, २) अमृतानुभव, ३) चांगदेव पासष्टी, ४) अभंग, ५) हरिपाठ या साहित्यसंपदेच्या मर्यादेत संशोधन करणे अपेक्षित आहे. तसेच वीरशैव संप्रदायाचे मूलभूत तत्त्वज्ञान विशद करणारे वाङ्मयभांडार प्रमाण मानण्यात येईल. ज्ञानेश्वर वाङ्मयाची केवळ वीरशैव तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून चिकित्सा करणे अभिप्रेत असल्यामुळे या दोन पंथ विचारसरणीची मांडणी करणाऱ्या वाङ्मयाची मर्यादा प्रस्तुत शोधकार्यात केंद्रिभूत आहे.

संशोधनाची पध्दती :—

१) सामुग्री संकलन

२) ऐतिहासिक अभ्यास पध्दती

३) वाङ्मयीन संशोधन पध्दती

४) तौलनिक अभ्यास पध्दती

‘‘ संत ज्ञानेश्वर यांच्या वाङ्मयाचा वीरशैव दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास” या विषयावरील संभाव्य शोध प्रबंधाच्या प्रकरणांची रूपरेषा, प्रारूप पुढील प्रमाणे असेल.

शोध प्रारूप

१ शीर्षक :– संत ज्ञानेश्वर यांच्या वाङ्मयाचा वीरशैव दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास.

प्रकरण १ ले

वीरशैव संप्रदाय व वारकरी संप्रदायाची पार्श्वभूमी

१) वीरशैव संप्रदाय :–

अ) उगम

आ) प्राचीन साहित्यातील उल्लेख

इ) शिवोपासक महाराष्ट्र

ई) पंचाचार्य आणि विरक्त परंपरा

२) वारकरी संप्रदाय :–

अ) उगम

आ) वारी शब्दाचा अर्थ

इ) प्राचीन उल्लेख

ई) भक्त पुंडलीक ते ज्ञानेश्वरांपर्यंतचा कालखंड

३) वीरशैव संप्रदाय आणि वारकरी संप्रदायातील अनुबंधाची पार्श्वभूमी

अ) महाराष्ट्र–कर्नाटक प्रादेशिक सलगता

आ) वीरशैव,नाथपंथ आणि वारकरी पंथ यांच्यातील अनुबंध

इ) कल्याण क्रांतीचे दुरगामी परिणाम

ई) संतांचा समन्वयवादी दृष्टिकोन

प्रकरण २ रे

संत ज्ञानेश्वर : व्यक्तित्त्व आणि कर्तृत्त्व

श१) ज्ञानेश्वरपूर्व परिस्थिती :—

अ) सामाजिक परिस्थिती

ब) राजकीय परिस्थिती

क) धार्मिक परिस्थिती

ड) वाङ्मयीन परिस्थिती

२) ज्ञानेश्वर समकालीन व उत्तरकालीन संत परंपरा आणि साहित्यनिर्मिती

३) संत ज्ञानेश्वर चरित्र व कार्ये

४) ज्ञानेश्वरांची वाङ्मय संपदा :—

अ) ज्ञानेश्वरी

ब) अमृतानुभव

क) चांगदेव पासष्टी

ड) अभंग

इ) हरिपाठ

५) वारकरी पंथाच्या संदर्भातील कार्य :—

अ) वारकरी पंथाची स्थापना

ब) वारकरी पंथाचे तात्त्विक अधिष्ठान

क) वारकरी पंथाचा प्रचार व प्रसार

ड) नामदेवांसोबतची तीर्थयात्रा.

प्रकरण ३ रे

भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील संत ज्ञानेश्वरांचे स्थान

१) भारतीय दर्शन परंपरांचा आढावा :—

अ) आस्तिक दर्शन

ब) नास्तिक दर्शन

२) वेदान्त तत्त्वज्ञान :—

अ) ब्रम्हसुत्रे

ब) शंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वज्ञान

क) रामानुजांचे द्वैत तत्त्वज्ञान

ड) वीरशैवांचे शक्तीविशिष्टाद्वैत तत्त्वज्ञान

इ) ज्ञानेश्वरांचे चिद्‌विलासवादी तत्त्वज्ञान

३) काश्मिरी शैव तत्त्वज्ञान :—

अ) स्पंदशास्त्र

ब) त्रीक दर्शन

क) प्रत्यभिज्ञा दर्शन

ड) आनंदवर्धन आणि अभिनवगुप्तांचा शांतरस प्रधान रसविचार

इ) ज्ञानेश्वरांचा रसाविष्कार

४) नाथपंथाचे तत्त्वज्ञान :—

अ) नाथ परंपरा

ब) नाथपंथाचे तत्त्वज्ञान

क) ज्ञानेश्वरांचे नाथपंथोक्त तत्त्वज्ञान

५) वारकरी पंथाचे तत्त्वज्ञान :—

अ) ज्ञानदेवे रचिला पाया

आ) भक्तीचा मार्ग सर्वांसाठी खुला

इ) पंढरपूरचा श्री विठ्ठल आणि त्याची उपासना

१) नामस्मरण

२) एकादशी व्रत

३) पंढरपूरची वारी

ई) शून्यवादाचे खंडण

ऊ) जगाचे स्वरूप

ए) जीवाचे स्वरूप

ऐ) परमात्म्याचे स्वरूप

प्रकरण ४ थे

वीरशैव संप्रदाय : व्याख्या, स्वरूप आणि तत्त्वज्ञान

१) वीरशैव व्याख्या व स्वरूप

२) वीरशैव तत्त्वज्ञान :—

अ) षट्स्थल सिध्दान्त

आ) अष्टावरण

इ) पंचाचार

ई) छत्तीस तत्त्वांची मांडणी

उ) शक्तीविशिष्टाद्वैत

ऊ) लिंगांगसामरस्य

३) वीरशैव साहित्याचा उद्‌गम व विकास :—

अ) आगम

आ) सिध्दान्त शिखामणी

इ) वचन साहित्य

ई) संत सहित्य

प्रकरण ५ वे

संत ज्ञानेश्वर व त्यांच्या वाङ्मयावरील वीरशैव तत्वज्ञानाचा प्रभाव

१) पार्श्वभूमी

२) नाथपंथ आणि वीरशैव

अ) नाथपंथावरील वीरशैवांचा प्रभाव

आ) नाथपरंपरेतील ज्ञानेश्वरांचे स्थान

इ) नाथपंथीय ज्ञानेश्वर आणि वीरशैव : एक अनुबंध

३) बसवेश्वर आणि ज्ञानेश्वर :—

अ) मंगळवेढा आणि पंढरपूर

ब) बसवेश्वरांची कल्याणक्रांती आणि ज्ञानेश्वर

क) वीरशैव तत्त्वज्ञानाचा ज्ञानेश्वरांपर्यंतचा प्रवास

४) वीरशैव पंथीय कवी व ज्ञानेश्वर :—

अ) भोजलिंग काका

ब) चांगदेव

क) विसोबा खेचर

५) ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील वीरशैव तत्त्वज्ञानाच्या पाऊलखुणा :—

अ) ज्ञानेश्वरी

आ) अमृतानुभव

इ) चांगदेव पासष्टी

ई) अभंग

उ) हरिपाठ

प्रकरण ६ वे

संत ज्ञानेश्वरांचे वाङ्मय आणि वीरशैव संप्रदायातील वाङ्मय : एक तुलना

१) परस्परांवरील प्रभाव

अ) ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयावरील वीरशैवांचा प्रभाव

आ) ज्ञानेश्वर वाङ्मयाचा वीरशैवांच्या वाङ्मयावर पडलेला प्रभाव

२) साम्य :–

अ) लोकभाषेतून उपदेश

ब) समन्वयशील दृष्टिकोन

क) लोकांच्या उद्धाराची तळमळ

ड) यज्ञ–कर्मकांडाचा निषेध

इ) सदाचरणाची शिकवण

ई) भक्तिमार्गाची शिकवण

उ) सगुण–निर्गुण भक्ती

३) भेद :–

अ) उपासना पध्दती

आ) शैव–वैष्णव

इ) इष्टालिंगपूजक व मूर्तीपूजक

ई) प्रस्थानत्रयी

४) मूळस्त्रोत

प्रकरण ७ वे

महाराष्ट्रातील महासमन्वय तत्त्वज्ञानांची गंगोत्री : ज्ञानेश्वर वाङ्मय

१) पार्श्वभूमी

२) ज्ञानेश्वर वाङ्मय आणि वेदान्तमत

३) ज्ञानेश्वर वाङ्मय आणि बौध्दमत

४) ज्ञानेश्वर वाङ्मय आणि काश्मिरी शैवमत

५) ज्ञानेश्वर वाङ्मय आणि नाथपंथाचे तत्त्वज्ञान

६) ज्ञानेश्वर वाङ्मय आणि द्वैतमत

७) ज्ञानेश्वर वाङ्मय आणि वीरशैवमत

८) ज्ञानेश्वर वाङ्मय आणि वारकऱ्यांचे उपास्य दैवत श्री विठ्ठल : एक समन्वयाचा मूर्तीमंत झरा

९) ज्ञानेश्वर वाङ्मय आणि वारकरी संप्रदाय

१०) ज्ञानेश्वर वाङ्मयाच्या महासमन्वयदृष्टिकोनाचा संतांवरील प्रभाव :

अ) वारकरी संप्रदायातील संत

आ) वीरशैव संप्रदायातील संत

११) समारोप

प्रकरण ८ वे

निष्कर्ष व समारोप

या शेवटच्या ८ व्या प्रकरणात 'संत ज्ञानेश्वर यांच्या वाङ्मयाचा वीरशैव दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास' या विषयावर वरील ७ प्रकरणांच्या आधारे जी चिकित्सक मांडणी करण्यात येईल. त्याआधारे हाती आलेले निष्कर्ष नोंदविण्यात येतील. परिशिष्ट, संदर्भसूची, संदर्भग्रंथांची यादी प्रबंधाच्या शेवटी जोडण्यात येईल.

'संत ज्ञानेश्वर यांच्या वाङ्मयाचा वीरशैव दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास' या विषयावरील शोधप्रबंध लिहिताना, अवलोकन व चिकित्सा करताना इतर लेखकांच्या मतांचा आधार घेण्यात येईल व त्यांची संदर्भसूचीत कृतज्ञतेने नोंद करणे अपेक्षित आहे.

प्रत्यक्ष शोधकार्य करताना या विषयावरील मांडणी दरम्यान काही बदल संभवू शकतात. आवश्यक तो बदल करण्याची जिथे गरज आहे तिथे संशोधन मार्गदर्शकांच्या सल्ल्याने व निर्देशानुसार करण्यात येईल.

संशोधक विद्यार्थी

अनिल बाबू स्वामी

मु.पो.राणीसावरगाव

ता.गंगाखेड जि.परभणी–४३१५३६

मो.नं.९७६३३३६६३३

Email-anilswami54@gmail.com

संशोधन मार्गदर्शक

डॉ. विठ्ठल जंबाले

पदवी व पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख,

देगलूर महाविद्यालय,देगलूर–४३१७१७

मो.नं.९४२२८७९६०९

Email-jvithalh@gmail.com